# जीवनसिंग राठोड यांना भावपूर्ण श्रद्धांजली

साईनगर पडेगाव येथील रहिवासी जीवनसिंग धोंडूसिग राठोड वय (५६) यांचे दिनांक २२ मार्च २०२६ रोजी सकाळी ९:३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर राहत्या गावी



जाफरवाडी तालुका खुलताबाद येथे सायंकाळी ६:०० वाजता अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली एक मुलगा एक भाऊ असा परिवार आहे.

सध्या ते खुलताबाद पंचायत समितीत पाणीपुरवठा विभागात कार्यरत होते. त्यांनी जिल्हा परिषदेतही उल्लेखनिय कार्य केले. त्यांच्या अंत्यसंस्कारप्रसंगी राजकीय क्षेत्रातील, सामाजिक क्षेत्रातील, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती सभापती, सदस्य, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जीवनसिंग यांना श्रद्धांजली अर्पण केली. खुलताबाद तालुक्यातील जाफरवाडी हे त्यांचे मूळ गाव. गावात हे वृत्त कळताच शोकाकुल वातावरण पसरले होते. गेल्या तीन चार दिवसांपासून त्यांची मृत्यूशी झुंज घाटी या रूग्णालयात सुरू होती. सर्वांना वाटले की काही तरी चमत्कार होईल आणि जीवनसिंग त्यातून बरे होतील. परंतु सर्वांच्या पदरी निराशा पडली आणि अखेर २२ मार्च २०२६ रोजी त्यांची प्राणज्योत मालावली. सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध असणारी व्यक्ती म्हणून ते परिचित होते. कोणतेही काम असो त्या कामात त्यांची मदत लागत असल्यास ते मागे पुढे न पाहता मदतीचा हात पुढे करत होते. अशा व्यक्तीमत्वाला भावपूर्ण श्रद्धांजली.

– दिनेश परदेशी

# पोहरागडावर चैत्र नवमीला इतिहासात पहिल्यांदाच हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी; भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

चैत्र नवमीच्या पवित्र निमित्ताने पोहरागड येथे दरवर्षीप्रमाणे लाखो भाविकांची उपस्थिती अपेक्षित असून यंदा एक विशेष आणि ऐतिहासिक उपक्रम पार पडणार आहे. प्रथमच पोहरागडावरील माता जगदंबा, संत सेवालाल महाराज आणि बापू रामराव महाराज मंदिरावर इतिहासात पहिल्यांदाच हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे.

या अनोख्या उपक्रमाचे आयोजन बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. या पुष्पवृष्टीसाठी सुमारे १५ लाख रुपये खर्च करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्याचे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र रामसिंग पवार यांनी 'अट्टलमत'शी बोलताना दिली.



२५ मार्च रोजी पोहरागड येथे अखिल भारतीय बंजारा जनजागृती भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून देशातील विविध राज्यांमधून मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात रविकांत राठोड समाजाला मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर २६ मार्च रोजी सकाळी ९ वाजता लाखो भाविकांच्या साक्षीने मंदिरावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी केली जाणार आहे. महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश येथून आलेले भाविक या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होणार आहेत. याप्रसंगी महाराष्ट्रातील नवनिर्वाचित पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्यांचा व नवनिर्वाचित नगरपालिका व महानगरपालिकेतील नगरसेवकांचा भव्य सत्कार सोहळा, तांड्यातील ग्रामपंचायतीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सरपंचांचा आदर्श सरपंच पुरस्कार व सत्कार सोहळा आहे.

**26 मार्च रोजी सकाळी ९ वाजता लाखो भाविकांच्या साक्षीने मंदिरावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी**

# अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा – रवींद्र पवार

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

बंजारा समाजासह वंचित उपेक्षित शेतकरी ऊसतोड कामगार बांधवांची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र पोहरागड येथे दिनांक २५ मार्च बुधवार रोजी बंजारा ब्रिगेड च्या वतीने अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्या चे आयोजन सर्व संत महंतांच्या व बंजारा समाजातील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत करण्यात आलेले आहे. या मेळाव्याला समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रवींद्र पवार प्रदेश कार्याध्यक्ष बंजारा ब्रिगेड महाराष्ट्र राज्य यांनी केले आहे.

अखिल भारतीय बंजारा मेळाव्याला आमदार धर्मगुरू बाबूसिंगजी महाराज, धर्मगुरू अनंत कबीरदास महाराज धर्म गुरू महंत सुनील महाराज महंत जितेंद्र महाराज महंत शेखर महाराज, महंत यशवंत महाराज महंत रमेश महाराज महंत खुशाल महाराज महंत प्रकाश महाराज यांच्यासह भारतभरातून येणाऱ्या प्रमुख बंजारा नेत्यांची उपस्थिती राहणार आहे.

या मेळाव्याला बंजारा ब्रिगेड चे अध्यक्ष रविकांत राठोड मार्गदर्शन करणार असून मागील अनेक वर्षापासून देशपातळीवर अनेक समस्यांना बंजारा समाज तोंड देत आले असून त्याकडे शासन प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच महाराष्ट्रासह देशपातळीवर सामाजिक एकजुटीचा निर्णय घेण्याची वेळ आली असल्याने भारतातील वीस कोटी बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरागड येथे अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून या ठिकाणी महाराष्ट्रातील १४ राज्यातील बंजारा बांधवांची उपस्थितर राहणार आहे.

या भूतपूर्व ऐतिहासिक मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी बंजारा भटक्या विमुक्त समाजातील समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बंजारा ब्रिगेडचे प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र पवार यांनी केले आहे.



"जय सेवालाल.... समाजातील सर्व बंधू–भगिनींना मी आवाहन करतो येणाऱ्या २५ तारखेला बंजारा जनजागृती मेळाव्याचे आयोजन केले आहे. त्यात आपण सहभागी व्हावे, असे २६ मार्च रोजी सकाळी ९ वाजता हेलिकॉप्टरव्दारे इतिहासात पहिल्यांदाच पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. तरी आपण सर्व समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थिती लावून कार्यक्रमा ची शोभा वाढवावी, असे मी आवाहन करत आहे.

**–रविंद्र रामसिंग पवार**
प्रदेश कार्याध्यक्ष बंजारा ब्रिगेड महाराष्ट्र राज्य

# छत्रपती संभाजीनगरमध्ये सिमेंट कॉंक्रिटीकरण रस्त्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न!



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने हद्दीतील वॉर्ड क्रमांक २९, अयोध्या नगर, एन–७ सिडको परिसरातील आरोग्य सेवा कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत सिमेंट कॉंक्रिटीकरण रस्त्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.ना. श्री. अतुल मोरेश्वर सावे (मंत्री, इतर मागास व बहुजन कल्याण, दुग्ध विकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते करण्यात आले. या विकास कामामुळे आरोग्य सेवा कर्मचारी सहकारी गृहनिर्माण सोसायटी परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून रस्त्यांची गुणवत्ता सुधारण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच, वाहतुकीची सोय व पार्किंगची सुविधा अधिक सुलभ होऊन नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल अपेक्षित आहेत. या प्रसंगी स्थानिक नागरिक, पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवर : कार्यक्रमाला नगरसेवक व मान्यवर म्हणून गणेश नामंदर, शिवाजी दांडेगे, विशाल सानप (सानप ताईंचे सुपुत्र) तसेच भारतीय जनता पक्षाचे कट्टर कार्यकर्ते, राजेश मिरकर साहेब, पाटील ताई, सरिता घोडतुरे, बबलू निकम हे विशेष उपस्थित होते.

सोसायटी पदाधिकारी व सदस्य: सोसायटीचे अध्यक्ष मुंडे साहेब, उपाध्यक्ष पवार साहेब, सचिव राजू नागे, तसेच सोसायटी सदस्य– नागे अण्णा, डॉ. जयपालसिंग एन. कायटे, उमेश पवार, युवराज दांगे, विशाल चेकटकर, विजय वाघा, मंगळसिंग माहेर हेही कार्यक्रमाला उपस्थित होते.

# कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक CRRT सुविधेचे उद्घाटन: क्रिटिकल केअर अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

कमलनयन बजाज हॉस्पिटल (KBH) मध्ये आज कंटिन्युअस रेनल रिप्लेसमेंट थेरपी (CRRT) या अत्याधुनिक उपचार सुविधेचे उद्घाटन करण्यात आले. ही सुविधा ICU मधील गंभीर व अस्थिर रुग्णांना अधिक प्रभावी आणि अखंडित उपचार देण्यासाठी ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. CRRT ही २४ तास चालणारी डायलिसिस प्रक्रिया असून शरीरातील विषारी द्रव्ये, अतिरिक्त द्रव आणि असंतुलन त्याने हळूहळू व सुरक्षितरीत्या दूर होते आणि नैसर्गिक मूत्रपिंडासारखी कार्य करते.

डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस, मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांनी सांगितले, "KBH मध्ये CRRT सुविधेचे उद्घाटन हे आमच्या उत्कृष्ट, रुग्ण–केंद्रित आणि जागतिक दर्जाच्या आरोग्यसेवेसाठी असलेल्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. ही सुविधा उपलब्ध करून देताना आम्ही 'रुग्ण प्रथम' (Patients First) या तत्वाला अधिक बळकट करत आहोत. यामुळे गंभीर रुग्णांच्या उपचारात अधिक अचूकता आणि चांगले परिणाम साध्य होतील.

डॉ. समीर महाजन, कन्सल्टंट नेफ्रोलॉजिस्ट यांनी सांगितले, CRRT ही गंभीर रुग्णांसाठी अत्यंत उपयुक्त उपचार पद्धती आहे. यामुळे रुग्णाची स्थिती स्थिर ठेवत मूत्रपिंडाचे कार्य प्रभावीपणे साध्य करता येते. या सुविधेमुळे कमलनयन बजाज हॉस्पिटलने प्रगत क्रिटिकल केअर सेवांमध्ये एक नवा मानदंड निर्माण केला असून प्रगत आरोग्यसेवेच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक – श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन– ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199